


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २३०, बुधवार २९ मे २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# विश्वस्तपदाच्या २१ जागांसाठी ४१ उमेदवार रिंगणात

## ■ मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टची निवडणूक ■ बिनविरोध निवडणूकीचे प्रयत्न निष्फळ ■ २ जुन रोजी होणार मतदान

निघोज : प्रतिनिधी

**निघोज येथील मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या विश्वस्तपदाच्या बहुचर्चीत निवडणूकीत २१ जागांसाठी ४१ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात राहिले आहेत. अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी बिनविरोध निवड करण्यासाठी करण्यात आलेले अथक प्रयत्न निष्फळ ठरले असून आता येत्या २ जुन रोजी मोठया चुरशीने मतदान होणार आहे.**

गेल्या ४२ वर्षात देवस्थान ट्रस्टच्या विश्वस्तांची निवड एकमताने होत असे. यंदा मात्र सुरूवातीपासूनच विश्वस्तांच्या निवडीबाबात प्रचंड रस्सीखेच झाली. बिनविरोध निवडीसाठी ज्येष्ठ नेतेमंडळींसह कार्यकर्त्यांनीही मोठया प्रमाणावर प्रयत्न केले, मात्र उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या तिघांनी आम्ही लढणारच अशी भूमिका घेतल्याने निवडणूक अटळ ठरली.

गेल्या आठ दिवसांपासून निवडणूकीची प्रक्रिया सुरू आहे. ट्रस्टचे १ हजार २१४ सभासद असून त्यापैकी १ हजार १८१ मतदानासाठी पात्र आहेत. निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यानंतर २१ जागांसाठी मोठया प्रमाणावर १३६ उमेदवारी अर्जांची विक्री झाली. त्यापैकी उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवसाअखेर ४६ उमेदवारांनी आपले उमदेवारी अर्ज मागे घेतल्याने आता २१ जागांसाठी ४१ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत. गेल्या ४२ वर्षांपासून या ट्रस्टच्या विश्वस्तांची निवड बिनविरोध होत असे.यावेळीही ज्येष्ठ मंडळी तसेच युवकांनी मध्यस्ती करूनही दोन, तीन उमेदवार आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्याने निवडणूक होणार असल्याने सभसदांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.



### वराळ, लाळगे यांच्या नेतृत्वाखालील उमेदवार

**संदीप पाटील वराळ जनसेवा फाउंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन वराळ, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मंगेश लाळगे यांच्या नेतृत्वाखालील माऊली मळगंगा पॅनलचे मोहन कवाद, शांताराम ढवळे, सुनील पवार, मनोहर राऊत, दत्तात्रेय लंके, देवराम लामखडे, राजेंद्र लाळगे, संतोष वराळ, राहुल वराळ, रावसाहेब वराळ, ज्ञानेश्वर वरखडे, संदीप वरखडे, अनिल शेटे, शिवाजी भुकन हे १४ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत.**

### लंके, लामखडे, कवादांच्या नेतृत्वाखालील उमेदवार

**मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपाध्यक्ष शांताराम लंके, मा. सरपंच तथा निघोज कृषी फलोद्यान सहकारी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत लामखडे, बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन वसंत कवाद, मा. सरपंच ठकाराम लंके यांच्या नेतृत्वाखालील मळगंगा पॅनलचे वसंत कवाद, विठ्ठल कवाद, शांताराम कळसकर, लक्ष्मण ठवळे, अमृता रसाळ, संतोष रसाळ, शांताराम लंके, ज्ञानेश्वर लंके, ठकाराम लंके, अनिल लंके, शंकर लामखडे, ज्ञानेश्वर लामखडे, रोहिदास लामखडे, दिलीप लाळगे, मंगेश वराळ, सीमा वराळ, रामदास वरखडे, अशोक वरखडे, मोहिनी वरखडे, विश्वास शेटे, रामदास ससाणे हे २१ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत.**

### स्वतंत्र नशिब आजमावणारे उमेदवार

**दिलीप ढवण, रूपेश ढवण, काळूराम गजरे, सदानंद ढवळे, दत्तात्रेय भुकन, गणेश वराळ हे सहा उमेदवार स्वतंत्ररित्या निवडणूक लढवित आहेत.**

### चुरशीची निवडणूक होणार

**या निवडणूकीमध्ये आजी, माजी विश्वस्त, पदाधिकारी तसेच आजी-माजी सरपंच, उपसरपंच, सोसायटीचे आजी-माजी पदाधिकारी संचालक मोठया संख्येने रिंगणात उतरले आहेत. लंके, लामखडे, कवाद यांच्या नेतृत्वाखालील मंडळाचे उमेदवार सर्व २१ जागा लढवत असून सचिन वराळ व मंगेश लाळगे यांच्या नेतृत्वाखाली मंडळाने १४ जागांवर उमेदवार दिले आहेत. सहा उमेदवार स्वतंत्ररित्या आपले नशिब आजमावत आहेत. बहुतांश उमेदवार लोकप्रिय असल्याने निवडणूक चुरशीची होणार आहे.**

### मळगंगाला छत्री, परिवर्तनला कपबशी

**शांताराम लंके, चंद्रकांत लामखडे, वसंत कवाद, ठकाराम लंके यांच्या नेतृत्वाखालील मळगंगा पॅनलला छत्री तर सचिन वराळ, मंगेश लाळगे यांच्या नेतृत्वाखालील माऊली मळगंगा परिवर्तन पॅनलला कबपशी हे चिन्ह देण्यात आले आहे. स्वतंत्र उमेदवार काळूराम गजरे यांना जिपगाडी, सदानंद ढवळे यांना ट्रॅक्टर, दिलीप ढवण यांना सिंह, रूपेश ढवण यांना विमान, दत्तात्रय भुकन यांना तुतारी, गणेश वराळ यांना बॅट हे चिन्ह देण्यात आले आहे.**

# आयसीएलच्या भारतातील पहिल्या उद्योगाचे भूमीपूजन

## ■ सुपा-पारनेर औद्योगिक क्षेत्रात सुरू होणार प्रकल्प ■ पाण्यात विरघळणाऱ्या खताचे उत्पादन होणार



■ इस्त्रायलमधील आयसीएल या कंपनीचा पाण्यात विरघळणाऱ्या खतनिर्मीती प्रकल्पाचे मंगळवार दि. २८ मे रोजी सुपा-पारनेर औद्योगिक वसाहतीमध्ये विविध मान्यवरांच्या उपस्थितीत भूमीपूजन करण्यात आले.

पारनेर : प्रतिनिधी

**इस्त्रायलमधील आयसीएल या कंपनीच्या पाण्यात विरघळणाऱ्या खतनिर्मिती प्रकल्पाचे मंगळवार दि. २८ मे रोजी सुपा-पारनेर औद्योगिक वसाहतीमध्ये विविध मान्यवरांच्या उपस्थितीत भूमीपूजन करण्यात आले.**

यावेळी कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत कुलकर्णी, ग्लोबल कॅपेक्सचे व्यवस्थापक रॉन फीशर, लॉजेस्टीक मॅनेजर सी एल एन राव, सेल्स लिड विनोदकुमार, कमोडिटीज लिड तपस्वी शरण, प्रोजेक्ट मॅनेजर सचिन कदम, स्टेट मॅनेजर राकेश पाटील, मार्केटींग मॅनेजर राकेश काटकर, अॅडमीन मॅनेजर योगश देशपांडे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत कुलकर्णी म्हणाले, आपण विश्वामधील कोणत्याही खंडात गेलो तर आपणास आयसीएलचे नाव दिसते. औद्योगिक, कृषि आणि अन्न प्रक्रिया या क्षेत्रात जगात पहिल्या क्रमांकाची ही कंपनी आहे. सन २०१५ मध्ये या कंपनीचा प्रवास भारतात सुरू झाला. आयसीएलचा ब्रँड अनेकांनी पाहिला नसावा. आयसीएलकडून सहा ते सात लाख टनापर्यंत भारतामध्ये पोटॅशचा पुरवठा केला जातो. खत उत्पादनामध्येही आयसीएल ने काम सुरू केले असून त्यातील पहिल्या क्रमांकाचे उत्पादन आयसीएलचे आहे. भारतातील उद्योग वाढीसाठी हा प्रकल्प सुपा-पारनेर औद्योगिक क्षेत्रात सुरू करण्यात येत आहे. पुढील एक वर्षात हा प्लॅन्ट सुरू करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले असल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले.

### गावासाठी योगदान देणार

**हा चांगला परिसर आहे. परीसरातील बाबुर्डी, पळवे येथील गावकऱ्यांसोबत कंपनीचे जिव्हाळ्याचे संबंध प्रस्तापित होत आहेत. गावासाठी काहीतरी करणे गरजेचे असते. आयसीएल ते नक्कीच करणार आहे. उद्योगासाठी शेतकऱ्यांची जमीन जाते. त्याची सल शेतकरी वर्गाच्या मनात असते. मात्र उद्योग उभे राहिल्यानंतर आपलीही आर्थिक प्रगती होणार आहे.**

अनंत कुलकर्णी, सीईओ

### रोजगारात स्थानिकांना प्राधान्य

**भारतामधील आयसीएलचा पहिलाच प्रकल्प उभा राहत असताना स्थानिक ग्रामस्थांनी मोठया संख्येने हजेरी लावली ही समाधानाची बाब आहे. आमचे उत्पादन सुरू होईपर्यंत व त्यानंतरही स्थानिकांनी असेच पाठबळ द्यावे. हा उद्योग सुरू झाल्यानंतर साठ लोकांना रोजगार उपलब्ध होईल. शिक्षणानुसार स्थानिक तरूणांना रोजगार देण्यास कंपनीकडून प्राधान्य देण्यात येईल.**

सचिन कदम, प्लॅन्ट हेड

### प्रकल्प बहुउद्देशीय ठरेल

**या उद्योगामुळे महाराष्ट्राची भरभराट होईल आणि आपल्या शेतकरी बांधवांनाही या उत्पादनातून लाभ होईल त्यामुळे हा उद्योग बहुउद्देशीय ठरणार आहे.**

सुधीर शिरोळे
मॅनेजमेंट कन्स्लटंट, जेकब्स सोल्युशन इंडीया

# यंदा काय होईल, हे ब्रह्मदेवही सांगू शकणार नाहीत !

## अजितदादांच्या विधानाची तुफान चर्चा

मुंबई : प्रतिनिधी

**लोकसभा निवडणुकीत काय होईल? हे ब्रह्मदेवही सांगू शकणार नाही असे विधान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे. बीड, जालना, परभणी या जिल्ह्यात जातीयवादावर निवडणूक झाली. मराठा आणि इतर समाज असे काही वातावरण गावात पाहायला मिळाले असे मत देखील अजित पवारांनी व्यक्त केले आहे. त्यांच्या या विधानाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे.**

शिवसेनेबाबत टोकाची भूमिका घ्या असे सांगितले जायचे अजित पवार यांनी महाविकास आघाडीत असताना शिवसेनेचा कार्यक्रम करायला सांगितले जायचे असे म्हटले आहे.

महाविकास आघाडीत आम्ही ज्यावेळी एकत्र काम करायचो तेव्हा आम्हाला शिवसेनेबाबत टोकाची भूमिका घ्या असे सांगितले जायचे. मग मी त्यांना का असे विचारायचो? तर ते म्हणायचे की, शिवसेनेबाबत टोकाची भूमिका घेतल्यावर अल्पसंख्यांकाना समाधान मिळते. मात्र, या निवडणुकीत अल्पसंख्यांक ठाकरे गटासोबत जायला निघाला होता. काय कुठं कसं गणित बदलंत. यावेळेस काय होणार? हे ब्रह्मदेवही सांगू शकणार नाही, असे अजित पवार यांनी म्हटले.

आपण जातीपातीमध्ये अडकून बसतो पुढे अजित पवार म्हणाले, बीड, जालना, परभणी या जिल्ह्यात जातीयवादावर निवडणूक झाली.



मराठा आणि इतर समाज असे काही वातावरण गावात पाहायला मिळाले. देश कुठं चाललाय? जग कुठं चाललोय? आपण जातीपातीमध्ये अडकून बसतो आहोत. आता शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीसंदर्भात छगन भुजबळ यांनी सांगितलं. मात्र, आपण सरकारमध्ये असेपर्यंत तसे काहीही होऊ देणार नाही, असे अजित पवार म्हणाले.

लोकसभेप्रमाणे विधानसभेत होणार नाही तसेच लोकसभा निवडणुकीत विजय मिळवला तरी त्यांचा उन्माद होऊ द्यायचा नाही. पराभव झाला तरी कोणीही खचून जायचे नाही. हे राजकारणात सर्वांनी लक्षात ठेवावे, असे आवाहन अजित पवार यांनी केले आहे. लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभेत होणार नाही. आपला कोणताही कार्यकर्ता आणि पदाधिकारी नाराज होणार नाही, अशा सन्मानजनक जागा आपल्याला नक्की मिळतील, असेही अजित पवार म्हणाले.

# अरविंद केजरीवाल यांना सुप्रीम कोर्टाचा मोठा धक्का

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

**कथित मद्य घोटाळा प्रकरणात अटक करण्यात आलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना आज ( २८) मे रोजी सुप्रीम कोर्टाने मोठा धक्का दिला आहे. कोर्टाने त्यांच्या अंतरिम जामिनाला मुदतवाढ देण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर तातडीने सुनावणी करण्यास नकार दिला.**

अरविंद केजरीवाल यांना अंतरिम जामिनावर तुरूंगातून बाहेर सोडण्यात आले असून त्याची अंतिम मुदत १ जून पर्यंत आहे. परंतु अरविंद केजरीवाल यांचे वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी केजरीवाल यांच्या आरोग्य तपासणीसाठी अंतरिम जामीन ७ दिवसांनी वाढवावा, अशी मागणी करणारी याचिका सोमवारी सुप्रीम कोर्टात दाखल केली होती. याच याचिकेवर न्यायमूर्ती ए.एस.ओक यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने तात्काळ सुनावणी घेण्यास नकार दिला आहे.

**या आधी मागणी का केली नाही ?**

दरम्यान, केजरीवाल यांनी जामीन मुदत वाढीचा अर्ज उशिरा दाखल केल्याबद्दलही कोर्टाने प्रश्न उपस्थित केले आहेत. न्यायमूर्ती ए.एस. ओक यांच्या खंडपीठाने, मुख्य प्रकरणावरील आदेश १७ मे रोजी राखून ठेवण्यात आला होता. त्या खंडपीठाचे एक सदस्य न्यायाधीश गेल्या आठवड्यात सुट्टीतील खंडपीठात होते. तेव्हा ही मागणी का केली नाही? असा सवाल



कोर्टाकडून उपस्थित करण्यात आला आहे.

**गंभीर आजाराची लक्षणे असण्याची शक्यता**

अरविंद केजरीवाल यांनी सुप्रीम कोर्टाकडे पीईटी-सीटी स्कॅनसह सर्व तपासासाठी अंतरिम जामीन एक आठवड्याने वाढवण्याची मागणी केली आहे.






निरोगी आरोग्याचा कानमंत्र...

# निरामय

## अर्धांगवायू लक्षणे

अर्धांगवायू म्हणजे पक्षाघात, ज्यामध्ये शरीरातील काही ठराविक भागातील स्नायूंची हालचाल अचानक मंदावते अथवा बंद होते. यासाठीच जाणून घेऊ या अर्धांगवायूची लक्षणे...

- संवेदना अथवा जाणीव कमी होणे : अर्धांगवायूचा संबंध हा मेंदू आणि मज्जासंस्थेशी असल्यामुळे या आजारातील प्रमुख लक्षण हेच की संवेदना अथवा जाणीव अचानक कमी होते. ज्या भागावर पक्षाघात झाला आहे त्या भागामधील स्नायूंची संवेदना अचानक बंद होते. बऱ्याचदा या आजारात एखाद्याचे अर्धे अथवा संपूर्ण शरीर, हात अथवा पाय असे अवयव निकामी होतात. मात्र जर मेंदूचा अर्धांगवायू म्हणजेच स्ट्रोक झाल्यास हृदयातून मेंदूला रक्त पुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्या बंद होतात अथवा फुटतात. ज्यामुळे ती व्यक्ती कोमात जाते अथवा बेशुद्ध होते. मेंदूला लकवा मारल्यामुळे त्या व्यक्तीच्या संपूर्ण शरीराची हालचाल बंद होते. अशा व्यक्तीची जगण्याची शक्यता खूपच कमी असते. योग्य आणि वेळेवर उपचार मिळाल्यास त्या व्यक्तीला जीवदान मिळू शकते. हात, पाय, अर्धे शरीर अशा भागावर अर्धांगवायू झाल्यास उपचार करून त्या व्यक्तीला बरे करता येते. मात्र त्यासाठी शरीरामध्ये होणारे हे बदल पटकन समजणे गरजेचे आहे.
- मानसिक अवस्था बिघडणे : अर्धांगवायूचा झटका येण्याआधी त्या व्यक्तीची मानसिक स्थिती हळूहळू बदलू लागते. जसं की ती व्यक्ती क्षणात विचित्र वागते आणि क्षणात पुन्हा नीट वागू लागते. दैनंदिन कामे करताना त्या व्यक्तीचा गोंधळ उडतो. चक्कर येते अथवा काम करण्याचा कंटाळा येतो. एखादी गोष्ट डबल दिसते अथवा नसलेल्या गोष्टी असल्याचा भ्रम होतो. थोडक्यात अशी मानसिक स्थिती असलेल्या व्यक्तीला अर्धांगवायू होण्याचा धोका जास्त असतो. अर्धांगवायू होण्याचे एक कारण मानसिक ताण असू शकते.
- स्मरणात ठेवणे कठीण जाणे : अर्धांगवायू होण्याआधीचे आणखी एक महत्त्वाचे लक्षण म्हणजे स्मरणशक्तीवर परिणाम होणे. जर एखाद्याला सतत कोणतीही गोष्ट आठवणीत ठेवणं कठीण जात असेल, विचार करणं जमत नसेल, बोलताना अडथळा येत असेल, समोरच्या व्यक्तीचे बोलणे समजत नसेल, उच्चार करताना, वाचताना अथवा लिहिताना त्रास होत असेल, स्नायूंची हालचाल योग्य पद्धतीने होत नसेल तर ही लक्षणे अर्धांगवायूची असू शकतात. त्यामुळे अशी लक्षणे आढल्यास त्या व्यक्तीला त्वरीत वैद्यकीय मदतीची गरज आहे हे ओळखावे.
- श्वसनाचा त्रास होणे अथवा धाप लागणे : मज्जासंस्थेमुळे शरीतातील सर्व क्रियांवर नियंत्रण ठेवले जाते. मात्र जेव्हा या कार्यात बिघाड होतो तेव्हा त्याचा परिणाम इतर अवयवांवर दिसू लागतो. जसं की श्वसन क्रियेत अडथळे अथवा श्वास घेण्यास त्रास जाणवतो. धाप लागणे, श्वास घेता न येणे, तोंडावाटे श्वास घ्यावा लागणे, श्वास घेताना मोठ्याने आवाज येणे, घरघर लागणे, घशात श्वास अडकणे अशी लक्षणे असतील तर त्या व्यक्तीला अर्धांगवायू होण्याची शक्यता असू शकते.
- तीव्र डोकेदुखी : शारीरिक कार्य उत्तम रितीने होण्यासाठी मेंदूला पुरेसा रक्तपुरवठा व्हायला हवा. मात्र जेव्हा मेंदू अथवा मज्जासंस्थेला रक्तपुरवठा होत नाही तेव्हा शारीरिक कार्यात अडथळे निर्माण होतात. रक्तपुरवठा कमी प्रमाणात मिळाल्यास मेंदूला कार्य करणे कठीण जाते. ज्यामुळे तीव्र डोकेदुखीचा त्रास रुग्णाला जाणवतो. अतिदाबामुळे रक्तवाहिनी फुटल्यास अथवा बंद झाल्यास स्ट्रोक येतो आणि त्या व्यक्तीला वैद्यकीय मदत द्यावी लागते. मात्र हा त्रास तात्पुरत्या स्वरुपाचा असेल तर डोकेदुखीनंतर तो पूर्ववत करता येतो. यासाठीच तीव्र डोकेदुखी जाणवल्यास त्वरीत वैद्यकीय मदत घ्यावी.



# पक्षाघात!

**अर्धांगवायू म्हणजेच पक्षाघात या आजारात माणसाच्या शरीरातील स्नायूंची हालचाल बंद झाल्यामुळे त्याचे अर्धे शरीर लुळे पडते अथवा निकामी होते. मज्जासंस्था ही शरीरातील एक महत्त्वाची यंत्रणा असून, ती मेंदू आणि पाठीच्या कण्यामध्ये असते. मात्र अर्धांगवायू झाल्यास मज्जासंस्था आणि मेंदूच्या कार्यात अडचणी येतात आणि शरीराचा अर्धा भाग अनियंत्रित होतो. स्नायू कमकुवत झाल्यामुळे अर्धांगवायूचा आजार बळावतो आणि स्नायूंची क्षमता पूर्ण कमी होते...**

अर्धांगवायूची लक्षणे शरीरातील कोणत्याही भागावर जाणवू शकतात. बऱ्याचदा यात शरीराचा एक भाग निकामी होतो मात्र काही वेळा दोन्हीकडील भागावरही याचा परिणाम दिसून येतो. काही लोकांना कंबरेखालील भागावर अर्धांगवायूचा परिणाम दिसून येतो. ज्याला पॅराप्लेजिआ असं म्हणतात, तर क्वाड्रिप्लेजिया अर्धांगवायूमध्ये माणसाचे दोन हात आणि दोन पाय निकामी होतात. अपघात, मानसिक धक्का अथवा पाठीच्या कण्यातील दुखापतीमुळे अर्धांगवायू होण्याचे प्रमाण अधिक आहे. अर्धांगवायूचा झटका अचानक येतो यासाठीच प्रत्येकाला अर्धांगवायू लक्षणे आणि अर्धांगवायू घरगुती उपचार याविषयी माहिती असणं गरजेचं आहे.

## अचानक मूड अथवा व्यक्तिमत्त्व बदलणे


मानसिक स्थितीवर मेंदू आणि मज्जा संस्थेद्वारा नियंत्रण ठेवले जाते. मात्र अर्धांगवायूमध्ये मज्जासंस्थेवरील नियंत्रण सुटल्यामुळे सर्व शारीरिक आणि मानसिक क्रिया बिघडतात. ज्यामुळे माणसाच्या वागण्या बोलण्यावरचा ताबा जातो. म्हणूनच अर्धांगवायूचे आणखी एक महत्त्वाचे लक्षण हे की त्या व्यक्तीचा अचानक मूड बदलतो आणि ती व्यक्ती एखादी वेगळं व्यक्तिमत्त्व असल्याप्रमाणे वागू लागते.

- शरीरावरील नियंत्रण जाणे : मेंदूवरील अनियंत्रणामुळे शारीरिक हालचालीवर ताबा ठेवणे कठीण जाते. ज्यामुळे त्या व्यक्तीचे हात, पाय, शरीर अनियंत्रित होते. अंग थरथरणे, हात अथवा पाय लुळे पडणे, अंगाचा तोल जाणे, बसणे अथवा उभे राहता न येणे, चेहरा वाकडा होणे, बोलताना अडथळे येणे, हालचाल करता न येणे अशी लक्षणे जाणवत असतील तर त्या व्यक्तीला अर्धांगवायू झाला असून, त्वरीत वैद्यकीय मदत देण्याचा प्रयत्न करावा.
- सतत तोंडातून लाळ गळणे : जिभेतून सतत लाळ निर्माण केली जात असते. कारण तोंडात लाळग्रंथी असतात जे लाळेची निर्मिती करत असतात. तोंडावाटे निर्माण झालेल्या लाळेमुळे आपण खाल्लेल्या अन्नाचे व्यवस्थित पचन होत असते. तोंडातील आणि जिभेच्या स्नायूंमुळे तोंडात निर्माण होणारी लाळ नियंत्रित ठेवली जाते. शिवाय जेव्हा गरज असते तेव्हाच या लाळेची निर्मिती होत असते. मात्र अर्धांगवायूमुळे तोंड आणि जिभेचे स्नायू निकामी होतात. ज्यामुळे तोंडाचा आकार बदलतो आणि तोंडातून सतत लाळ गळू लागते. यासाठीच अर्धांगवायू झालेल्या व्यक्तीच्या तोंडातून लाळ गळत असते.
- अंगाला बधीरपणा येणे : शरीरातील स्नायूंची संवेदना कमी झाल्यामुळे अर्धांगवायूत व्यक्तीचे शरीर लुळे पडते. लकवा आलेल्या अथवा पक्षाघात झालेल्या व्यक्तीच्या शरीरातील काही ठराविक अवयवांच्या स्नायूंमध्ये संवेदना नसल्यामुळे त्या भागावर बधीरपणा येतो. अशा व्यक्तीच्या लुळ्या पडलेल्या अवयवाला स्पर्श केल्यास त्याला कोणत्याही संवेदना जाणवत नाहीत. त्यामुळे एखाद्या अवयवाच्या संवेदना कमी झाल्या असतील तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

## अर्धांगवायू घरगुती उपचार

**अर्धांगवायूचा झटका आलेल्या व्यक्तीला सर्वप्रथम वैद्यकीय उपचार घ्यावेत. मात्र त्यानंतर त्या व्यक्तीचे लुळे पडलेले शरीर मानसिक आधार आणि घरगुती उपचारांनी बरे करता येऊ शकते...**

- मोहरीच्या तेलाने मालिश : लकवा मारलेल्या शरीराला तेलाने मालिश केल्यास काही दिवसांमध्ये त्यामध्ये सुधारणा दिसून येते. यासाठी अर्ध्या लिटर मोहरीच्या तेलात ५० ग्रॅम लसूण टाकून लोखंडी कढईत ते गरम करावे. थंड झाल्यावर तेल गाळून एखाद्या काचेच्या बाटलीत अथवा बरणीत ठेवावे. मोहरीचे तेल आणि लसणाचे मिश्रण अंगाला लावून मालिश केल्यामुळे अर्धांगवायूमध्ये चांगला आराम मिळतो.
- गरम पाणी अन् तुळशीच्या पानांची वाफ : लकवा मारलेल्या व्यक्तीला अर्धांगवायू झालेल्या शरीराला शेक देणं गरजेचं असतं. यासाठी तुम्ही गरम पाण्यात तुळशीची पाने टाकून त्याची वाफ अथवा शेक त्या भागाला देऊ शकता. या वाफेमुळे अंगातील स्नायूंना प्रोत्साहन मिळू शकते. ज्यामुळे पुन्हा त्या व्यक्तीचे अवयव नीट होऊ शकतात. मात्र हा उपचार इतर वैद्यकीय उपचारांसोबत घ्यावा. ज्यामुळे करत असलेल्या उपचारांना प्रोत्साहन मिळू शकते.
- दूध आणि खजूर : दूध आणि खजूर या दोन्हीमध्ये अशक्तपणा दूर करणारे गुणधर्म असतात. हे दोन पदार्थ एकत्र करून रुग्णाला खाण्यास दिल्यामुळे त्याच्या अंगात ताकद येते. लोहाचे प्रमाण वाढण्यासाठी, हाडे मजबूत होण्यासाठी, स्नायूंना बळकटी येण्यासाठी दूध आणि खजूर फायदेशीर ठरतात. यासाठी रोज दूधात काही खजूर भिजवून त्या व्यक्तीला खाण्यास द्यावे.
- काळी मिरी आणि तूपाचा लेप : अर्धांगवायू बरा करण्यासाठी अनेक वेळा आयुर्वेदिक आणि घरगुती उपचार प्रभावी ठरतात. अशा रुग्णांना अर्धांगवायू झालेल्या भागावर लेप लावण्याची पद्धत आहे. यासाठी एक चमचा काळी मिरी वाटून घ्यावी आणि तीन तीन चमचे शूद्ध तूपात मिसळून त्याचा लेप रुग्णाच्या अंगाला लावावा. असा लेप लावून मालिश केल्यामुळे हळू हळू त्या रुग्णाच्या शरीरात प्रगती झालेली दिसून येऊ शकते.



## अर्धांगवायूबाबत महत्त्वाचे प्रश्न...

- अर्धांगवायूचा झटका आल्यास कोणते उपचार करावे? : अर्धांगवायू झालेल्या व्यक्तीला प्रथमोपचार देण्यासाठी आधी त्या व्यक्तीला कुशीवर झोपवावे आणि पुढे वैद्यकीय मदत घ्यावी. त्यामुळे त्या व्यक्तीची श्वसन क्रिया सुरळीत सुरू राहते. लक्षणे तपासून कोणत्या प्रकाराचा अर्धांगवायू झाला आहे याचे निदान करून डॉक्टर त्या व्यक्तीला वैद्यकीय उपचार देतात.
- अर्धांगवायू कशामुळे होतो? : अर्धांगवायू होण्याची कारणे अनेक आहेत. मेंदूंचे गंभीर आजार, ऑटोइम्यून विकार, स्ट्रोक, हृदयविकार, विषबाधा अशा कारणांमुळेही अर्धांगवायू होण्याची शक्यता असते. गंभीर स्वरुपाच्या म्हणजेच स्ट्रोक अथवा मानेच्या मणक्याच्या दुखापतीमुळे होणाऱ्या अर्धांगवायूची लक्षणे त्वरीत जाणवतात. अशा परिस्थितीत रुग्णाला ताबडतोब वैद्यकीय मदतीची गरज असते.
- अर्धांगवायूचा धोका कसा कमी करावा? : अर्धांगवायू होऊ नये यासाठी नियमित रक्तदाब, रक्तातील साखर, वजन नियंत्रित ठेवण्याचा प्रयत्न करावा. हृदयविकार असणाऱ्या लोकांनी नियमित तपासणी करावी. योग्य आहार, विहार आणि व्यायामाची सवय स्वतःला लावावी.

# घनदाट केसांसाठी शाम्पूत हे करा मिक्स!

**प्रत्येक महिलेला वाटतं की आपल्या केसांची मजबूती चांगली असावी आणि आपले केस हे पातळसर न राहता घनदाट असावेत. त्यासाठी अनेक वेगवेगळे उपाय आणि अगदी पार्लरमध्ये जाऊन केसांची काळजी घेण्यापर्यंत सगळ्या गोष्टी अनेक महिला करत असतात. घरगुती उपायांपासून ते अगदी कोणी जे काही सांगेल ते सर्व करण्यासाठी तयार असतो. पण काही उपाय इतके पक्के असतात की, हे केल्यानंतर तुम्हाला घनदाट केस हे नक्की लाभतील. केसांची योग्य वाढ आणि घनदाट केस हवे असतील तर आम्ही तुम्हाला उपाय सांगणार आहोत. पार्लरच्या महागड्या ट्रिटमेंटपेक्षा तुम्ही तुमच्या नियमित शाम्पूमध्ये केवळ दोन गोष्टी समाविष्ट केल्या तर तुम्हाला तुमचे केस उत्तम राखता येतील. कोरफड जेल आणि गुलाबपाणी या दोन गोष्टींचा वापर करून तुम्हीसुद्धा अप्रतिम केस मिळवू शकता. तसंच तुमच्या केसांची हमखास वाढ होऊ शकते. यामुळे केसगळती कमीदेखील होते.**



### कोरफडचे केसांसाठी फायदे

कोरफडमध्ये आढळणारे पोषक तत्व हे केसांमध्ये मुलायमपणा राखण्यास मदत करते. तसेच केसांना लागणारे आवश्यक पोषण प्रदान करण्याचे कामही करते. त्यामुळे केस लवकर वाढतात. तसंच कोरफड जेल हे स्काल्पमधील रक्तप्रवाह वाढवून केसांना मजबूती देण्याचे काम करते. अशाप्रकारे कोरफड केसांचा विकास करण्यासाठी अधिक फायदेशीर ठरते. कोरफड जेल हे कोंडा आणि स्काल्पमधील येणारी खाज दूर करण्यासाठीही उपयोगी ठरते. तसंच अँटीडँड्रफ गुण यामध्ये असल्याने याच्या वापराने कोंड्याची समस्या पटकन सुटते. याच गुणामुळे याचा वापर शँपू अथवा कंडिशनरमध्ये मुख्य घटक म्हणून करण्यात येतो. इतकंच नाही कोरफड जेल तुम्ही शँपूमध्ये मिक्स करून लावल्याने केसांना पोषक तत्व मिळतात. कोरफड जेलमध्ये मुख्य स्वरूपात विटामिन बी1, बी2, बी6 आणि बी12 असतात जे केसांचा विकास अधिक करण्यास मदत करतात.

## गुलाबपाण्याचे केसांसाठी होणारे फायदे

केसांसाठी गुलाबपाणीदेखील कोरफड जेलप्रमाणेच लाभदायक आहे. गुलाबपाण्यामध्ये अँटिइन्फ्लेमेटरी गुण असतात. तसंच यामध्ये अँटिफंगल प्रभावही असतो. हे सर्व फंगल संक्रमणाचा प्रभाव कमी करून कोंडा कमी करण्यासाठी उपयोगी ठरते. गुलाबपाणी एका शोधानुसार, कोंडा नियंत्रित करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका निभावते. गुलाबपाण्याचा वापर केसांवर केल्याने केस लांबसडक, घनदाट आणि चमकदार राखण्यास मदत मिळते. तुम्ही तुमच्या शाम्पूमध्ये गुलाबपाणी मिक्स करून थोडा वेळ मसाज करा. केसांची गळती यामुळे कमी होण्यास मदत मिळते.

## कसे बनवावे आणि वापरावे...



एक चमचा गुलाबपाणी आणि दोन चमचे कोरफड जेल घ्या. या दोन्ही गोष्टी तुम्ही तुमच्या नेहमीच्या शँपूमध्ये मिक्स करून घ्या. केस पाण्याने भिजवा आणि केसांना हा शँपू लावा आणि व्यवस्थित मसाज करा. 2-3 मिनिट्स मसाज करा आणि मग केस कोमट पाण्याने धुवा. ज्या ज्या वेळी तुम्ही केसांना शँपू कराल तेव्हा तेव्हा तुम्ही हा प्रयोग करा. एक महिना तुम्ही याचा वापर केलात तर तुम्हाला याचा परिणाम दिसून येईल. हा उपाय नैसर्गिक असून केसांची चमक वाढविण्यासाठी आणि केसगळती कमी करण्यासाठी, तसंच केसांचा विकास होण्यासाठी याचा उपयोग होतो. तुम्हीदेखील याचा वापर करू शकता.

# गुंता केसांचा !



**केस धुतल्यानंतर अथवा झोपेतून उठल्यानंतर सर्वात पहिली त्रासदायक गोष्ट म्हणजे केसांचा होणारा गुंता. त्यातही केस जर मोठे असतील तर हा गुंता सोडविणे म्हणजे एक सर्वात मोठा टास्क आहे असंच म्हणायला हवं. केसांचा एकदा गुंता झाला की, तो सोडविणे हे महाकठीण काम. त्यातही केस कुरळे असतील तर मग दमछाक होणे नक्कीच. पण तुम्ही केस धुतल्यानंतर अथवा झोपतून उठल्यानंतर अगदी सहजरित्या हा केसांचा गुंता सोडवू शकता. केसांचा गुंता सोडविण्यासाठी आम्ही तुम्हाला ५ सोप्या टिप्स देत आहोत. तुम्ही याचा वापर करून सहजपणे केसांचा गुंता आता सोडवा. यामुळे तुमचे केसही तुटणार नाहीत आणि केसांची काळजी व्यवस्थित घेतली जाईल हे निश्चित.**

- स्टेप 1 - कंडिशनर : आपण शाम्पू केल्यानंतर केसांना कंडिशनर लावतोच. जर तुम्ही लावत नसाल तर आताच सुरू करा. कारण कंडिशनर केसांना केवळ पोषणच देत नाही तर केसांचा गुंता सोडविण्यासाठी ही सर्वात पहिली स्टेप अर्थात सर्वात पहिली पायरी आहे. तुम्ही केसांमध्ये शँपू लावल्यानंतर केसांना कंडिशनर लावा. मुळापासून कंडिशनर कधीही लाऊ नये. केवळ केसांना वरून कंडिशनर लावावे. त्यानंतर तुम्ही नेहमी लक्षात ठेवा की, केस धुतल्यानंतर गुंता व्हायला नको असेल तर कंडिशनर लावल्यावरच तुम्ही केसांमधून जाड दातांचा कंगवा फिरवा. वरून खाली केस विंचरा. कंडिशनर तुम्ही साधारण 3-4 मिनिट्स तसंच राहू द्या. त्यानंतर तुम्ही तुमचे केस पाण्याने स्वच्छ धुवा. तसंच सर्वात महत्त्वाचे म्हणजे केस धुताना अधिक गरम पाण्याचा वापर करू नका.
- स्टेप 2 - टॉवेलने सुकवणे : केस धुऊन झाल्यावर पहिले टॉवेलने पाणी तुम्ही टिपून घ्या. मग केसातील पाणी झाडून टाका आणि मग केस टॉवेलमध्ये गुंडाळून ठेवा. ५-१० मिनिट्स केस टॉवेलमध्ये तसेच राहू द्या. पण लक्षात ठेवा केस टॉवेलमध्ये अधिक घट्ट बांधू नका. त्यामुळे केस तुटण्याची शक्यता असते. त्यामुळे केस बांधताना व्यवस्थित तुम्ही अगदी हलक्या हाताने बांधा. टॉवेल घट्ट बांधून घेऊ नका. अन्यथा ओल्या केसांमुळे डोकं दुखण्याची शक्यता निर्माण होते.
- स्टेप 3 - लिव्ह इन कंडिशनर : जेव्हा केसांचा गुंता सोडविण्याची बाब असते तेव्हा तुम्ही एक लाईटवेट कंडिशनर वापरावे. कोणत्याही सीरमपेक्षा अधिक योग्य लिव्ह इन कंडिशनर असते. यासाठी तुम्ही तुम्हाला आवडेल ते लिव्ह इन कंडिशनर घ्या. हे केसांना तुटण्यापासून वाचविण्यासाठी मदत करते. तसंच ओल्या केसात लावल्याने केसांचा गुंता पटकन सोडविण्यासही मदत मिळते. त्याशिवाय लिव्ह इन कंडिशनर लावल्याने केसांना अधिक चांगली चमकही मिळते. मात्र त्वरीत तुम्ही घरच्या बाहेर जाऊ नका. कारण यावर पटकन धूळ आणि माती चिकटून बसते. त्यामुळे थोडा वेळ वाट पाहूनच तुम्ही बाहेर जा.



- स्टेप 4 - केसांना विभागा : केसांचा गुंता सोडविण्यासाठी तुम्ही कंगव्याने एकत्र केस विंचरू नका. कारण हे चुकीचे आहे. यामुळे केसांचा गुंता अधिक वाढतो. केस तुम्ही विभागून घ्या आणि मगच विंचरा. केसांना मध्ये भांग पाडा आणि मग केस विंचरले की, गुंता सोडविणे सोपे होते. तसंच केस खेचले जात नाहीत आणि तुटतही नाहीत.
- स्टेप 5 - मोठ्या दातांचा कंगवा वापरा : केसांचा गुंता सोडविण्यासाठी तुम्ही मोठ्या दातांचा कंगवा वापरा. केसांसाठी नेहमीच मोठ्या दातांचा कंगवा योग्य ठरतो. यामध्ये केस अडकून पडत नाहीत आणि गुंता पटकन सोडवला जातो. केस खालून विंचरायला पहिले सुरुवात करा आणि मग वरच्या बाजूला विंचरा. सर्व केसांचा गुंता सोडवून झाला की, पुन्हा एकदा सर्व केस व्यवस्थित विंचरून घ्या.

## शॉर्ट न्यूज

### शेवगावकरांना गढूळ पाण्याचा पुरवठा

■ **शेवगाव :** शहरातील ४५ हजार नागरिक पाणीटंचाईला तोंड देत आहेत. काही भागात १२ ते १५ दिवसांनी पाणीपुरवठा होत असून तो ही गढूळ, गाळ, मैला मिश्रित होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने शेवगावकरांचा पाण्याचा पाण्याचा प्रश्न तत्काळ सोडवावा, अशी मागणी माजी जिल्हा परिषद सदस्या हर्षदा काकडे यांनी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांच्याकडे केली आहे. याबाबत त्यांनी निवेदन देवून जिल्हाधिकार्यांना गढूळ पाण्याची बाटली दिली.

### ज्ञानेश्वर महाविद्यालयात गुणवंतांचा सन्मान

■ **नेवासा :** येथे श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय गुणवंतांचा सन्मान समारंभ आयोजित केला होता. यावेळी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील एकूण ३४ विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी पालक प्रतिनिधी म्हणून दिवाणी न्यायाधीश गजानन यादव, प्राचार्य डॉ. गोरक्षनाथ कल्हापुरे, माजी उपप्राचार्य दशरथ आयनर, उपस्थित होते. न्यायाधीश यादव म्हणाले, महाविद्यालयात शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना शिस्त लावणे महत्त्वाचे असते. ती शिस्त या महाविद्यालयात मला दिसली. पालक म्हणून मी माझ्या मुलीच्या प्रगतीवर खूश आहे.

### गोमांस वाहतूक करणारा ट्रक पकडला

■ **संगमनेर :** तालुका पोलिसांच्या पथकाने कासारे शिवारात जांभुळवाडी फाटा परिसरात गोमांस वाहतूक करणारा आयशर ट्रक पकडला. पाच लाख किंमतीचा आयशर ट्रक आणि तब्बल ७ लाख ५० हजार रुपये किंमतीचे गोमांस असा एकूण १२ लाख ५० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. तालुका पोलिसांच्या पथकाने ही कारवाई केली. याप्रकरणी हे. कॉ. दत्तात्रय बडधे यांनी फिर्याद दिली. आरोपी जाकिर खान नसिर खान पठाण (रा. संगमनेर) व अय्युब महेबुब कुरेशी (रा. संगमनेर) यांच्या विरुद्ध पुन्हा नोंदविण्यात आला.

### उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी घेतले शनिदर्शन

■ **शनिशिंगणापूर :** दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मनोजकुमार ओहरी,अमित शर्मा व दिनेशकुमार शर्मा यांनी नेवासा तालुक्यातील शनिशिंगणापूरला भेट देऊन चौथऱ्यावर तेल अभिषेक करून दर्शन घेतले. दर्शनाच्या अगोदर सर्वांनी उदासी महाराज मठात संकल्प सोडवून अभिषेक केला. शनैश्वर देवस्थान ट्रस्टच्या जनसंपर्क कार्यालयात नेवासे न्यायालयाचे न्यायमूर्ती जी बी यादव यांनी स्वागत केले. देवस्थानचे विश्वस्त दीपक दरंदले यांनी शाल, श्रीफळ व प्रसाद देऊन सत्कार केला. येथील दर्शनानंतर सर्व न्यायमूर्ती शिर्डीकडे दर्शनाकरिता रवाना झाले.

### दीप लगड गणित विषयात बोर्डात पहिला

■ **श्रीगोंदा :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक बोर्डाने इयत्ता दहावीचा निकाल नुकताच जाहीर केला. त्यात रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा संकुलातील महादजी शिंदे विद्यालयाचा निकाल ९७. १३ टक्के इतका लागला. विद्यालयाचा विद्यार्थी दीप अतुल लगड याने गणित विषयात १०० गुण मिळवत बोर्डात पहिला येण्याचा मान मिळविला. विद्यालयात दीप अतुल लगड याने ९७. २० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. साईराज ईश्वर नवगिरे याने ९२. ०० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक तर राजवर्धन संजय दळवी याने ९०. ८० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला.

# भंडारदरा धरणात केवळ ९ टक्के पाणीसाठा

## पाण्याच्या योजना अडचणीत



**अकोले : प्रतिनिधी**

**मागील वर्षी पावसाने हात आखडता घेतल्याने उत्तर नगर जिल्ह्याला वरदान ठरलेल्या भंडारदरा धरणात यंदा केवळ ९ टक्के पाणीसाठा आहे. गतवर्षी याच काळात जवळपास ५३ टक्के पाणीसाठा होता. समन्यायी पाणी वाटपामुळे मुळा-भंडारदरा-निळवंडेतून पाणी जायकवाडीसाठी सोडण्यात आले. त्यामुळे आता हे धरण खपाटीला गेले आहे.**

भंडारदरा धरणातून सोडण्यात येणारे पाणी आता बंद करण्यात आले आहे. ११०१९ दलघफू क्षमतेच्या या धरणात सध्या केवळ १०४८ दलघफू (९.४९टक्के) साठा आहे. हवामान खात्याचा अंदाज आणि पाणलोटात काजव्यांचे झालेले आगमन यामुळे यंदा मान्सून पाणलोटात लवकरच दाखल होण्याची शक्यता आहे. पण तसे न झाल्यास उत्तर नगर जिल्ह्यापुढे पाण्याचे मोठे संकट उभे राहणार आहे. शेती आणि पिण्याच्या पाण्याच्या योजना अडचणीत येणार आहेत.

# पाण्याशी खेळ करतोय घात

## नाशिक जिल्ह्यात आठवड्यात नऊ जणांचा बुडून मृत्यू

**नाशिक : प्रतिनिधी**

**धरणे, तसेच अन्य जलाशयांच्या ठिकाणी पर्यटकांचा बुडून मृत्यू होण्याच्या घटना वाढत आहेत. जिल्ह्यात आठवडाभरात वेगवेगळ्या ठिकाणी तब्बल नऊ जणांनी अशा घटनांत जीव गमावला. वैतरणात बुडालेल्या एकाचा शोध सुरूच असल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिली. त्यामुळे पाण्यात उतरण्याचे जीवघेणे धाडस करू नका, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.**

एरवी वर्षाविहारासाठी पर्यटनस्थळी जाणाऱ्या पर्यटकांचा पाण्यात बुडून मृत्यू होत असल्याच्या घटना दर वर्षी घडतात. मात्र, यंदा पावसाळा सुरू होण्यास अजून काहीसा अवकाश असला, तरी पाण्यात बुडून मृत्यू होण्याच्या घटना वाढू लागल्या आहेत. जिल्ह्यात आठवडाभरात तब्बल नऊ जणांचा बुडून मृत्यू झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. यंदा उन्हाचा तडाखा वाढला असून, उकाड्याने नागरिक त्रस्त आहेत. कधी नव्हे ते जिल्ह्याचे कमाल तापमान ४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांचा आनंद लुटण्यासाठी पर्यटनस्थळांना भेटी देण्यास नागरिक घराबाहेर पडत आहेत. त्यातल्या त्यात जलाशयांच्या ठिकाणी पर्यटनास जाण्यास पसंती मिळत आहे. मात्र, पाण्याचा अंदाज नसताना त्यामध्ये उतरण्याचे धाडस अनेकांच्या जिवावर बेतत आहे.

इगतपुरी तालुक्यातील भावली धरण परिसरात भटकंतीसाठी गेलेल्या पाच जणांचा पाण्यात खेळताना बुडून मृत्यू झाला. यामध्ये नाशिकरोड परिसरातील तीन मुली व दोन मुलांचा समावेश आहे. अनस खान दिलदार खान (वय १५ वर्षे), नाझिया इम्रान खान (१५), मिजबाह दिलदार खान (१६), हनिफ अहमद शेख (२४) आणि ईकरा दिलदार खान (१४, सर्व रा. गोसावीवाडी, नाशिकरोड) यांचा मृत्यू झाला. भावली धरणाच्या पाण्यामध्ये खेळताना ही दुर्घटना घडली. हरणबारी धरणात मासे



पकडण्यासाठी गेलेल्या दत्तू चिंतामण सोनवणे (१८) याचा बुडून मृत्यू झाला. सिन्नर येथील सार्थक बाळू जाधव (१४) व अमित संजय जाधव दोघेही देव नदीवरील कुंदेवाडी बंधाऱ्यावर अंघोळीला गेले असता पाण्यात बुडून त्यांचा मृत्यू झाला.

मुंबई येथील सिद्धेश गुरव (२३) हा मित्रांसोबत आळवंडी धरण परिसरात फिरण्यासाठी आला होता. धरणात अंघोळ करताना पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने तो बुडाला. सोमवारी (दि. २७) दुपारी त्याचा मृतदेह आढळून आल्याचे प्रशासनाने सांगितले. याशिवाय मुंबईतील अंधेरी येथील मुफद्दलाल हरहरवाला (४५) हे वैतरणा धरणालगतच्या धबधब्याच्या डोहात बुडाले आहेत. त्यांचा अद्याप शोध लागला नसल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी श्रीकृष्ण देशपांडे यांनी दिली.

**ही खबरदारी घ्या.**

- पाण्याच्या ठिकाणी शक्यतो जाऊच नका
- पोहता येत असेल तरच पाण्यात उतरण्याचे धाडस करा
- पोहता येत असले, तरीही लाइफ जॅकेट घालूनच पाण्यात उतरा
- माहिती नसलेल्या ठिकाणी पाण्यात उतरणे टाळा
- अत्यंत खोल पाण्यात जाणे टाळावे
- पाण्यात उतरणे गरजेचे असल्यास साधन-सामग्री तपासून उतरा
- धोकादायक ठिकाणी फोटो, सेल्फी काढणे टाळा
- वाहन घेऊन पर्यटनाला जात असाल, तर टायर-ट्यूब, मजबूत लांब दोरी सोबत ठेवा
- घरी आपली कोणीतरी वाट पाहत आहे, हे विसरू नका

# अय्यप्पा मंदिराचा ३० वा वर्धापन दिन संपन्न

## शोभायात्रा ठरली सावेडीकरांचे आकर्षण



**सावेडी : प्रतिनिधी**

**सावेडीतील आयप्पा मंदिराचा ३० वा प्रतीस्थापना महोत्सव(वर्धापनदिन)मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित गेली ३ दिवस विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले तर आज संध्याकाळी निघालेली शोभा यात्रा मधील तालापोल्ली व चेंडमेलम सावेडीकराचे आकर्षण ठरले अशी माहिती अध्यक्ष के. के.शेट्टी यांनी दिली.**

सावेडीतील श्री अय्यप्पा मंदिर हे अत्यंत आकर्षक असून त्याची उभारणी ३० वर्षांपूर्वी झाली यामध्ये अय्यप्पा स्वामी,गणपती व सरस्वतीची स्वतंत्र मंदिरे आहे, यास २९ वर्षे पूर्ण झाली असून वार्षिक वर्धापनदिनानिमीत पहाटेपासूनच विविध धार्मिक कार्यक्रम झाले यामध्ये दोन दिवस विविध पूजा संपन्न झाल्यावर तिसऱ्या दिवशी गणपती होमम,उषापूजा,अष्टबंधम चारथाळ,कलशाभिषेकम् ,वाहन प्रतिष्ठा आणि नमस्कार मंडप समर्पण,कुंभभिषेक,उंच पूजा,भगवती सेवा,पुष्पाभिषेकम्, अथझा पूजा संपन्न झाली.

संध्याकाळी सावेडीतून भव्य शोभायात्रा(तालापोल्ली) काढण्यात आली यामध्ये महिलांनी मोती कलरच्या साड्या परिधान करून हातात फुलांनी सजवलेली ताट व त्यामध्ये अर्धा नारळ दिवा प्रज्वलित केले होते व यामध्ये वाद्यवृंदानी चेंडमेलम सादर केला.ही तालापोल्ली सावेडीकराचे आकर्षण ठरली तसेच मंदीर परिसर फुलांनी व दिव्यांनी सजविण्यात आला होता नंतर मंदिरात या शोभा यात्रेची सांगता झाली नंतर भगवती सेवा,पुष्पाभिषेकम्, अथजा पूजा होऊन महाप्रसाद संपन्न झाला यावेळी अनेक मान्यवरांसह मोठ्या संख्नेने भाविक उपस्थित होते.

# लोकसभेचे मतदान संपताच उपमुख्यमंत्री अजित पवार अडचणीत

**मुंबई : प्रतिनिधी**

**अजित पवार हे भाजप-शिवसेनेसोबत सत्तेत सहभागी झाल्यानंतर त्यांना अनेक प्रकरणात दिलासा मिळाल्याचे दिसून आले होते. यात ईडीच्या वतीने चौकशी सुरू असलेल्या जरंडेश्वर कारखान्याची चार्जशीट दाखल करताना त्यातून अजित पवार यांचे नाव देखील वगळण्यात आले होते. मात्र, आता लोकसभा निवडणुकीची मतदान प्रक्रिया संपल्यानंतर पुन्हा एकदा एसीबीने या प्ररकणाची चौकशी सुरू केली आहे. त्यामुळे अजित पवार यांच्या अडचणी पुन्हा वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**

उपमुख्यमंत्री अजित पवार त्यांच्याशी संबधित असलेल्या जरंडेश्वेर साखर कारखान्याची पुन्हा एकदा चौकशी सुरू करण्यात आली आहे. राज्याच्या लाचलुचपत विभागाच्या वतीने अर्थात एसीबीकडून ही चौकशी सुरू करण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे. जरंडेश्वर कारखान्याची चौकशी म्हणजे अजित पवारांसाठी हा मोठा धक्का असल्याचे मानले जाते आहे.

नेमके जरंडेश्वर कारखाण्याचे हे प्रकरण काय?

जरंडेश्वर साखर कारखाना हा शालिनीताई पाटील या चालवत होत्या. त्यावेळी कर्जात बुडालेल्या या कारखान्याला वाचवण्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले होते. मात्र, त्यांना यश आले नाही. अखेरीस हा कारखाना लिलाव प्रक्रियेत गेला आणि हा कारखाना गुरु कमोडिटी या प्रायवेट लिमिटेड कंपनीने लिलाव प्रक्रियेतून खरेदी केला. अजित पवार यांच्याशी संबंधित व्यक्तीने हा कारखाना विकत घेतल्याची माहिती नंतर समोर आली. त्यामुळे जरंजेश्वर कारखान्याची ही लिलाव प्रक्रिया बोगस असल्याचा आरोप शालिनीताई पाटील यांनी केला होता.









# पाणी आमच्या हक्काचे ; आम्ही ते मिळविणारच!

■ प्रसंगी संघर्ष करण्याचीही तयारी ■ पारनेरकरांनी केला टेंभूत निर्धार ■ विश्वनाथ कोरडे यांचा पुढाकार ■ ३०० शेतकऱ्यांनी पाहीला टेंभू उपसा सिंचन प्रकल्प



**पारनेर : प्रतिनिधी**

**राजकीय इच्छाशक्ती व जनतेचा रेटा यामुळे अशिया खंडातील सर्वात मोठा असणारा टेंभू उपसा सिंचन प्रकल्प मार्गी लागला तब्बल २२ टीएमसी पाणी वितरीत करण्यात येत आहे आपल्या तालुक्यातील पाण्याची मागणी मात्र एक टीएमसी आहे या पाण्याकरता आम्ही संघर्ष करणार आणि पाणी मिळवणारच असा निर्धार पारनेरकरांनी टेंभु प्रकल्पावर केला.**

टेंभू येथील टेंभू उपसा सिंचन प्रकल्पास भाजपा नेते विश्वनाथ कोरडे यांच्या पुढाकारातुन अंजना फाउंडेशन मार्फत तालुक्यातील पठार भागावरील कान्हुर पठार, पिंपरीपठार,वेसदरे,विरोली,पिंपळगाव तुर्क,वडगाव दर्या,अक्कलवाडी,टाकळी ढोकेश्वर यासह एकुण ३८ गावांमधील ३०० शेतकऱ्यांना हा प्रकल्प पाहण्यासाठी नेण्यात आले होते.त्यावेळी शेतकऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

### संघर्षाची तयारी ठेवा

**शाश्वत पाणी मिळविण्यासाठी सर्वपक्षीय संघर्ष समितीद्वारे प्रयत्न करने आवश्यक आहे.भाजपा सरकार पाणी योंजनेसाठी नेहमीच अनुकूल राहीले आहे. टेंभू योजनाही युतीच्या काळात मार्गी लागली. विश्वनाथ कोरडे यांचे भाजपा पक्षात वरीष्ठांशी चांगले संबंध आहे याचा उपयोग पारनेरकरांनी करावा प्रसंगी संघर्षाची देखील तयारी ठेवावी.**

**राजाराम गरुड**
**टेंभू प्रकल्प आंदोलक**

### नकारात्मक विचार दूर झाला

**सुपे औद्योगिक वसाहतीत रोजगार निर्माण झाला आहे निघोज पट्टा बागायत आहे.आता उर्वरित दुष्काळी गावांच्या पाण्याच्या मागणीसाठी आम्ही सर्व संघर्ष करणार आहोत.ही गावे याबाबतीत नकारात्मक विचार करत होते तो आज दुर झाला आहे या पुढे योजनेसंदर्भातील टप्यानुसार सरकारकडे मागणी करणार आहोत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची या योजनेकरीता अनुकूलता आहे.**

**विश्वनाथ कोरडे**
**भाजपा नेते**

यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य विश्वनाथ कोरडे,डॉ.बाळासाहेब बांडे,सांगली जिल्हा भाजपा माजी जिल्हाध्यक्ष व टेंभु प्रकल्प आंदोलक राजाराम गरुड,ज्ञानेश्वर शिंदे,बाळासाहेब रेपाळे,वसंत शिंदे,उद्योजक अब्बास मुजावर, सिताराम देठे, दीपक रोहकले,अर्जुन नवले व इतर शेतकरी उपस्थित होते.

यावेळी गरुडकर यांनी या १९९५ प्रकल्पाचे भुमिपूजन ते ३० वर्षाचा टेंभु योजनेचा इतिहास,संघर्ष व यशाचे टप्पे विषद केले.याबरोबरच नदीजवळील पंप हाऊस,पाणी वितरण करण्यात येणारी प्रक्रिया,वितरीत परिसराची माहीती शेतकऱ्यांना दिली.

# डी.बी.एम.स्कूलने राखली शंभर टक्के निकालाची परंपरा

## अण्णा हजारे यांच्याकडून गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक



**राळेगणसिद्धी : प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून सोमवारी ऑनलाईन पद्धतीने दहावीच्या बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला.**

राळेगणसिद्धी पंचक्रोशीतील संस्कारक्षम व उच्च गुणवत्तापूर्ण शिक्षण यासाठी प्रसिद्ध असलेले डी बी एम स्कूल ने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी १०० % निकालाची परंपरा कायम राखत डी.बी.एम.स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

परीक्षेस प्रविष्ट झालेल्या २९ विद्यार्थ्यांपैकी एकूण २२ विद्यार्थी ८५ टक्के पेक्षा जास्त गुण मिळवून तर नऊ विद्यार्थी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवून बोर्ड परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत.एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत शाळेतील प्रथम क्रमांक. शेळके समीक्षा ( ९४.८०% गुण ) द्वितीय क्रमांक औटी हर्षदा ( ९४.६०% गुण) तृतीय क्रमांक औटी अवंतिका (९४.२०% गुण) चतुर्थ क्रमांक खामकर श्रुती( ९३.४०% गुण ) तर पाचवा क्रमांक शेळके ओम (९२.२० % गुण ) या विद्यार्थ्यांनी पटकावले आहेत.


सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे शाळेचे प्राचार्य जे.डी. मापारी सर यांनी अभिनंदन केले आहे. त्यासोबतच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे ,शाळेच्या निकालाचे ,शिक्षकांचे व शाळेचे प्राचार्य यांचे राळेगण सिद्धी परिसरातून कौतुक होत आहे .ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे व माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि शाळेच्या निकालाचे विशेष कौतुक केले आहे व या विद्यार्थ्यांच्या व शाळेच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# ग्रामीण बहुउद्देशीय विद्यालयाचा निकाल १०० टक्के

## शत प्रतिशत निकालाची परंपरा कायम

**निघोज : प्रतिनिधी**

**संजीवनी शिक्षण संस्थेच्या पिंपरीजलसेन येथील ग्रामीण बहुउद्देशीय विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल १०० टक्के लागला. यंदाही शंभर टक्के निकालाची परंपरा विद्यालयाचे कायम राखली. सलग चौथ्या वर्षी शत प्रतिशत विद्यार्थी उत्तीर्ण झाले.**



### हे आहेत टॉपर्स

**सदीच्छा संदीप जाधव ९५ टक्के प्रथम, पायल पांडूरंग थोरात ९४ टक्के व्दितीय, सर्वेश दादाभाऊ बोरूडे ९२.२०,तृतीय, निकिता शहाजी वाढवणे ९२.२० चतुर्थ, प्रांजल संपत घेमुड.६० पाचवी.**

### विषयानुसार टॉपर्स

**गणित विषयात १०० पैकी ९९, इंग्रजी विषयात १०० पैकी ९३, विज्ञान विषयात १०० पैकी ९३ टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणारे विद्यार्थी ४, ८० टक्क्यांपेक्षा जास्त गुण ६ विद्यार्थी, ७० टक्क्यांपेक्षा अधिक ३, ६० टक्क्यांपेक्षा अधिक ६, ५० टक्क्यांपेक्षा अधिक ४.**

जी एस महानगर बँकेचे संस्थापक अध्यक्ष स्व. गुलाबराव शेळके यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी संजीवनी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण बहुउद्देशीय विद्यालय सुरू केले. स्व. गुलाबराव शेळके यांचा वारसा स्व. उदयराव शेळके यांनी पुढे नेला. सध्या जीएस महानगर बँक व जिल्हा सहकारी बँकेच्या संचालिका गीतांजली शेळके या संजिवनी शिक्षण संस्थेची धुरा सांभाळत असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यावर त्यांचा भर आहे. संजिवनी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून कुरूंद येथे विविध व्यवसायीक अभ्यासक्रमांचेही शिक्षण देण्यात येते. दहावीच्या परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे, त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे गीतांजली शेळके यांनी अभिनंदन केले.

# जय मल्हार विद्यालयाचा निकाल शंभर टक्के

## स्नेहा घुले विद्यालयात प्रथम

**पिंपळगाव रोठा : प्रतिनिधी**

**पिंपळगावरोठा येथील जय मल्हार या सेमी इंग्रजी विद्यालयाने यावर्षीही निकालाची उत्कृष्ट परंपरा कायम राखली आहे. १० वी शालान्त परीक्षा,एसएससी मार्च २०२४ बोर्ड परीक्षा विद्यालयाचा निकाल१००% टक्के लागला असून विद्यालयाचे सर्व स्तरांमधून अभिनंदन होत आहे.**




गुणानुक्रमे प्रथम पाच विद्यार्थी खालील प्रमाणे १) घुले स्नेहा राजू ८३.६०%,२) उंडे श्रीपाद बाळू ८१.६०%,३)मुळे मानसी पांडुरंग८०.८०%,४)घुले प्रेम दादाभाऊ.००%,५)जेडगुले सिद्धी पांडुरंग ७७.८०,% हे आहेत


निकालाबद्दल संस्थेचे सचिव ॲड. पांडुरंग गायकवाड,संस्था पदाधिकारी ग्रामस्थ, मुंबईकर, पुणेकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक मुख्याध्यापक सुंबरे यु.जी, उंडे बी.आर, जरांगे एन.बी , गर्कळ बी.एस.,केदारी एन.बी ,सर्व शिक्षकेतर कर्मचारी, जय मल्हार विद्यालयाच्या नवीन इमारत बांधकामाला देणगी देणारे सर्व देणगीदार,हितचिंतक माजी विद्यार्थी,विद्यार्थिनी,संस्था,ग्रामस्थ, पालक, हितचिंतक,मुंबईकर या सर्वांच्या वतीने हार्दिक अभिनंदन होत आहे

# निघोजच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये स्वयंम ढवळे प्रथम

## दहावीचा निकाल १०० टक्के

**निघोज : प्रतिनिधी**

**बाबासाहेब कवाद ग्रामविकास सेवाभावी संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूल शाळेचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला असून गेली नऊ वर्षाची १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखल्याबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य व शिक्षक, विद्यार्थी यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.**






स्वयंम अशोक ढवळे हा विद्यार्थी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन ९५.४० टक्के मार्क मिळाले आहेत. द्वितीय क्रमांक निकीता कैलास काळे ९५ टक्के, तृतीय क्रमांक शिवराज सुनिल कदम ९४.६० टक्के, चतुर्थ क्रमांक ऋतुजा मच्छिंद्र मेसे ९४ टक्के अशाप्रकारे यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे. इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करुन संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब कवाद यांनी शैक्षणिक संस्कृतीला चालना देण्याचे काम केले आहे.


संस्थेचे अध्यक्ष शांताराम कळसकर, उपाध्यक्ष प्रकाश कवाद, सचिव वसंत कवाद यांनी गेली अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात योगदान देऊन शाळेचा नावलौकिक जिल्ह्यात वाढवला आहे. विश्वस्त मंडळ तसेच बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे पदाधिकारी व संचालक मंडळ तसेच निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेचे पदाधिकारी व संचालक तसेच निघोज ग्रामीण संस्था परिवाराचे सर्व सदस्य यांनी पदाधिकारी शिक्षक व विद्यार्थी यांचे अभिनंदन केले आहे.

# जिजामाता स्कुलचा ९८ टक्के निकाल ; ११ विद्यार्थ्यांना विशेष प्राविण्य

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर शहरातील आनंद मेडीकल ॲण्ड एज्युकेशन फाउंडेशन संचलित जिजामाता सेमी इंग्रजी स्कुलचा निकाल ९७.६७ टक्के इतका लागला. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेसाठी जिजामाता स्कुलचे ४३ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते.**

सृष्टी विनायक कावरे या विद्यार्थीनीने ८८.४० टक्के गुण प्राप्त करून विद्यालयात पहिला क्रमांक पटकाविला.भाग्यश्री भास्कर तराळ




हिने ८८.२० गुण मिळवून विद्यालयात दुसरा तर सौरभ विश्वकर्मा ललताप्रसाद याने ८३.८० टक्के गुण प्राप्त करून विद्यालयात तिसरा क्रमांक मिळविला. साहिल सचिन वर्धे याने ८२.६० टक्के गुण मिळवून चौथा तर संस्कृती संतोष खोसे हीने ७९.२० गुण मिळवून पाचव्या स्थान मिळविले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. सादीक राजे, विश्वस्त फहाद राजे, प्राचार्य संतोष ठाणगे, शिक्षक गवते, चेडे, वाघमारे, घुले, शशीकांत भालेकर, सतिश कावरे, पठारे, संजय शिंदे, शितल रोकडे यांनी अभिनंदन केले.

# विद्याधाम शास्त्र कनिष्ठ महाविद्यालयाचा शंभर टक्के निकाल

## ओमकार ढवणला गणितात शंभर पैकी शंभर गुण

**शिरूर : प्रतिनिधी**

**एचएससी (बारावी) बोर्ड परीक्षेत येथील विद्याधाम शास्त्र कनिष्ठ महाविद्यालयाचा शंभर टक्के निकाल लागला. याच महाविद्यालयाच्या ओमकार युवराज ढवण याने गणित विषयात शंभर पैकी शंभर गुण मिळविले.**



विद्याधाम महाविद्यालयाचे ३७१ विद्यार्थी बारावीच्या परीक्षेला बसले होते. त्यातील २०४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत; तर १०३ द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाल्याची माहिती प्राचार्य संजय शेळके यांनी दिली. या महाविद्यालयाच्या तेजस मारुती कदम या विद्यार्थ्याने ९२.३३ टक्के गुण मिळवून तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. अथर्व राजेंद्र शिर्के याने दुसरा क्रमांक मिळविला. त्याला ९२ टक्के गुण मिळाले. ९०.८३ टक्के गुण मिळवून ओमकार युवराज ढवण तिसरा आला. श्रावणी अर्जुन आढाव (८९.८३) हीने चतुर्थ; तर अथर्व द्वारकादास सरोदे (८८.८३) याने पाचवा क्रमांक मिळविला.

**विषयवार प्रथम आलेले विद्यार्थी व त्यांना मिळालेले गुण कंसात पुढीलप्रमाणे**
गणित : ओमकार ढवण (१००), इंग्रजी : तनिष्का बंडू ढमढेरे (८२), मराठी : प्रिया तानाजी चौधरी (९५), भौतिकशास्त्र : अथर्व शिर्के व अनिरुद्ध भरत आढाव (दोघांना ९०), रसायनशास्त्र : श्रावणी अर्जुन आढाव (९७), जीवशास्त्र : मयूरी महेश पांडे (९८), आय. टी. : श्रावणी अर्जुन आढाव व श्रावणी संतोष जोशी (दोघींना ९८), इलेक्ट्रॉनिक्स : तेजस मारुती कदम (१९५) विद्याधाम महाविद्यालयाचा व्यवसाय अभ्यासक्रम विभागाचा (एमसीव्हीसी) निकाल ८६.३६ टक्के लागला. प्रज्ञा विठ्ठल पुंडे, अंशुल उमेश शक्करवार व नूमान अल्ताफ इनामदार यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. शिरूर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अनिल बोरा, सी. टी. बोरा महाविद्यालय नियामक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश धारिवाल, संस्थेचे सचिव नंदकुमार निकम व विद्याधाम महाविद्यालय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धरमचंद फुलफगर यांनी गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

# वि का संस्थेचे मा. अध्यक्ष जयसिंगराव खिलारी यांचे निधन

**पारनेर : प्रतिनिधी**

**टाकळी ढोकेश्वर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे माजी अध्यक्ष, अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे निवृत्त शाखा व्यवस्थापक जयसिंगराव खिलारी पाटील यांचे शुक्रवारी (दि.२४ मे) निधन झाले.ते ७० वर्षांचे होते. पारनेर पंचायत समितीचे माजी सभापती काशिनाथ खिलारी पाटील यांचे ते कनिष्ठ चिरंजीव होत.त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,सून, दोन मुली,जावई,दोन भाऊ,एक बहीण,पुतणे असा मोठा परिवार आहे.**



टाकळी ढोकेश्वर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष,संचालक या पदांवर काम करताना तसेच जिल्हा बँकेतश्री.जयसिंगराव अधिकारी म्हणून काम करताना कै.खिलारी यांनी नाही नेहमीच शेतकरी हिताला प्राधान्य दिले. सामाजिक कार्याची आवड असलेले खिलारी अखेरपर्यंत पारनेर तालुक्याच्या सामाजिक,राजकीय क्षेत्रात कार्यरत होते.माजी आमदार नीलेश लंके यांचे ते समर्थक होते.माजी आमदार लंके, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर, शासकीय दूध डेअरीचे निवृत्त अधिकारी नंदकुमार दरेकर यांनी दु:ख व्यक्त केले आहे.

# स्वाती नाटे यांचे निधन

**निघोज : प्रतिनिधी**

**नगर येथील स्वाती सुनिल नाटे यांचे वयाच्या ५७ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले सामाजिक व धार्मिक कार्यात त्यांचा नेहमीच सहभाग असे. त्यांच्या पश्चात पती,एक मुलगा,एक मुलगी व जावई , पुतणे, नातू नाती असा मोठा परिवार आहे.**



नगर येथील सुनिल नाटे यांच्या त्या पत्नी होत. नगर येथील नामांकित कंपनीत कार्यरत असलेले सौरभ नाटे यांच्या त्या आई होत, शिल्पा नाटे यांच्या त्या सासु होत. स्नेहा आकाश उनवणे यांच्या त्या आई होत तसेच पुणे येथील अयोध्या ऑप्टिकल दुकानचे मालक आकाश उनवणे यांच्या त्या सासू होत. अतिशय सुस्वाभावी व प्रेमळ स्वभावाच्या स्वातीताई यांच्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पारनेर तालुका कोष्टी समाज सेवा मंडळ, भिंगार व अहमदनगर कोष्टी समाज सेवा मंडळ यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ • Mob : 9421478283 • Email : deviabuj@gmail.com